सत्यमेव जयते

महाराष्ट्राचे राज्यपाल

# माननीय श्री. भगत सिंह कोश्यारी

यांचे

# अभिभाषण

महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचे मुंबई येथील संयुक्त अधिवेशन

०८ जानेवारी २०२०

Scanned by CamScanner

**सभापती महोदय, अध्यक्ष महाराज व राज्य विधानमंडळाचे सन्माननीय सदस्यहो,**

सन २०२० या वर्षातील राज्य विधानमंडळाच्या पहिल्या अधिवेशनामध्ये आपणा सर्वांचे स्वागत करताना, मला अत्यंत आनंद होत आहे. आपणा सर्वांना, २०२० या नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.

**२.** १ डिसेंबर, २०१९ रोजी भरलेल्या अधिवेशनामध्ये या सन्माननीय सभागृहामध्ये आपण भेटलो होतो आणि सुमारे एक महिन्याच्या अल्प कालावधीनंतर आपल्याला पुन्हा भेटणे ही माझ्यासाठी निश्चितच अत्यंत आनंदाची बाब आहे.

**३.** छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि इतर महान द्रष्टे व समाजसुधारक यांनी घालून दिलेल्या मार्गाचे अनुसरण करण्यास, माझे शासन वचनबद्ध आहे.

**४.** माझे शासन, महाराष्ट्रातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, महिला व तळागाळातील इतर लोक यांच्या कल्याणासाठी वचनबद्ध आहे. माझे शासन, समाजातील या घटकांच्या कल्याणाचे ध्येय असलेल्या योजनांची व कार्यक्रमांची तत्परतेने अंमलबजावणी करील.

**५.** महिलांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना करण्याकरिता माझे शासन वचनबद्ध आहे. महिलांच्या संबंधातील गुन्ह्यांबाबत त्वरित व कठोर कारवाई करण्यात येईल. तसेच त्या प्रयोजनांसाठी कायद्यांमध्ये यथोचित सुधारणा करण्यात येतील.

**६.** माझे शासन, अनुसूचित जातींना व अनुसूचित जमातींना सामाजिक जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये यथोचित प्रतिनिधित्व मिळेल याची सुनिश्चिती करण्याचा आटोकाट प्रयत्न करील.



Scanned by CamScanner

यादृष्टीने, माझे शासन, राज्य विधानमंडळाच्या याच अधिवेशनामध्ये संविधान (एकशे सव्विसावी सुधारणा) विधेयक, २०१९ याचे अनुसमर्थन करणारा शासकीय प्रस्ताव मांडील. शासनाच्या या प्रयत्नास, सन्माननीय सदस्य मनापासून पाठिंबा देतील याची मला खात्री वाटते.

७. हे वर्ष, महाराष्ट्राच्या निर्मितीचे साठावे वर्ष आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील हुतात्म्यांना, मी श्रध्दांजली अर्पण करतो. महाराष्ट्राने, गेल्या ६० वर्षांमध्ये, कृषी, उद्योग, माहिती तंत्रज्ञान, कला, क्रीडा, संगीत, शिक्षण व जीवनाच्या इतर क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय प्रगती केलेली आहे. या कामगिरीचा सोहळा साजरा करण्यासाठी माझे शासन, विविध कार्यक्रमांचे आयोजन करील.

८. १ डिसेंबर, २०१९ रोजीच्या माझ्या अभिभाषणात, मी, महाराष्ट्र-कर्नाटक सीमेच्या संबंधात राज्याने दावा केलेल्या ८६५ गावांत राहणाऱ्या मराठी भाषिक जनतेच्या घटनात्मक हक्कांचे व विशेषाधिकारांचे संरक्षण करण्याच्या माझ्या शासनाच्या बांधिलकीचा पुनरुच्चार केला आहे. माझे शासन, सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या या प्रकरणात सातत्याने ठाम भूमिका मांडत राहील.

९. गेल्या वर्षी, मराठी रंगभूमी चळवळीस एकशे पंच्याहत्तर वर्षे पूर्ण झालेली आहेत. या वर्षामध्ये, मुंबई येथे या चळवळीचा इतिहास साकार करणारे संग्रहालय स्थापन करण्याचे आम्ही योजिले आहे.

१०. माझ्या शासनाने, 'शिव भोजन' योजना राबविण्याचे ठरविले आहे. गरीब व गरजू लोकांचे कल्याण हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. शिव भोजनाच्या प्रत्येक थाळीची किंमत, नागरी क्षेत्रांसाठी पन्नास रूपये इतकी असेल व ग्रामीण क्षेत्रांसाठी पस्तीस रूपये इतकी असेल. या योजनेअंतर्गत, गरीब व गरजू व्यक्तीने केवळ दहा रूपये प्रदान केल्यावर तिला अनुदानित दराने चौरस आहार मिळेल आणि उर्वरित रक्कम शासनाकडून देण्यात येईल. ही योजना, प्रत्येक जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणापासून व महानगरपालिका क्षेत्रांपासून सुरू करून टप्प्याटप्प्याने राबविण्यात येईल.

११. 'बळीराजाला' सहाय्य करण्यासाठी, माझ्या शासनाने, 'महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना' राबविण्याचे ठरविले आहे. या योजनेअंतर्गत, १ एप्रिल, २०१५ ते



Scanned by CamScanner

३१ मार्च, २०१९ या कालावधीत घेतलेल्या अल्पमुदती पीक कर्जाची व पुनर्रचना केलेल्या अल्पमुदती पीक कर्जाची मुद्दल व ३० सप्टेंबर, २०१९ रोजी असलेले त्यावरील व्याज यांचा समावेश असलेली दोन लाख रूपयांपर्यंतची थकित रक्कम माफ करण्यात येईल. माझे शासन, ही योजना कालबध्द रीतीने राबवील. अल्पमुदती पीक कर्जाची थकित रक्कम दोन लाख रूपयांहून अधिक  असलेल्या शेतकऱ्यांसाठी माझे शासन, एका सहाय्यता योजनेस अंतिम स्वरूप देत आहे. तसेच, आपल्या पीक कर्जाची वेळेवर परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना उत्तेजन देण्याच्या दृष्टीने, माझे शासन, लवकरच नवीन उपाययोजना घोषित करील.

**१२.** राज्यातील युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी उपाययोजना करण्यात येतील. माझे शासन, युवकांना सुरक्षा पुरविण्यासाठी वचनबद्ध आहे.

**१३.** माझे शासन, स्वामी विवेकानंदांच्या शिकवणुकीने प्रेरित आहे. ते असे म्हणाले होते की, "*युवा पिढीवर, आधुनिक पिढीवर माझा विश्वास असून त्यांच्यातूनच माझे कार्यकर्ते घडतील. ते संपूर्ण समस्यांचे सिंहाप्रमाणे निराकरण करतील.*" यादृष्टीने, नाशिक, ठाणे, अमरावती व नागपूर येथील आदिवासी विकास विभागाच्या प्रदेशनिहाय विभागांमध्ये टप्प्याटप्प्याने क्रीडा उत्कृष्टता केंद्रे किंवा क्रीडा अकादमी निर्माण करुन, नामांकित संस्था व तज्ज्ञ यांच्या सहयोगाने आदिवासी युवकांमधील क्रीडाविषयक निपुणतेस चालना देण्यासाठी माझे शासन, आटोकाट प्रयत्न करील.

**१४.** माझे शासन, महाराष्ट्रातील तीर्थस्थळांचे विकास कार्य हाती घेईल. मोठया प्रमाणात भक्तगण, शिर्डीची तीर्थयात्रा करतात. त्यांपैकी अनेकजण पदयात्रा करतात. माझे शासन, अशा यात्रेकरूंसाठी व पदयात्रींसाठी सुविधा पुरविण्याचे प्रस्तावित करते. माझे शासन, पहिल्या टप्प्यामध्ये, अशा पदयात्रींसाठी मुंबई ते शिर्डी या मार्गावर शौचालये, पिण्याचे पाणी व इतर सुविधा, इत्यादींसारख्या मुलभूत सुविधा पुरवील.

**१५.** माझे शासन, राज्यातील ग्रामीण तसेच नागरी जनतेला लाभदायी असणाऱ्या विविध कल्याणकारी योजना देखील घोषित करील. जीवनाच्या सर्व क्षेत्रातील लोकांना लाभदायक असणाऱ्या योजना राबविण्यात येतील. संत रामदासांनी म्हटल्याप्रमाणे, "*राजी राखता जग। मग कार्यभागाची लगबग। ऐसे जाणोनिया सांग। समाधान राखावे।*"



Scanned by CamScanner

१६. सन्माननीय सदस्यहो, या विशेष अधिवेशनामध्ये, उपरोक्त प्रस्ताव आपल्यासमोर विचारार्थ ठेवण्यात येईल. तसेच, या वर्षातील आगामी अधिवेशनांमध्ये, नवीन वित्तीय वर्षाचे अर्थसंकल्पीय प्रस्ताव, विनियोजन विधेयके आणि इतर विधिविधाने आपल्या विचारार्थ मांडण्यात येतील. सन्माननीय सदस्य सहभाग घेऊन या प्रस्तावांवर आपली अभ्यासपूर्ण मते मांडतील, याचा मला विश्वास आहे.

पुन्हा एकदा, आपणा सर्वांना माझ्या हार्दिक शुभेच्छा.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !**

Scanned by CamScanner